<u>तातडीचे / कालमर्यादीत</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
ज्ञा.क्र.नासुकें/१/कावि/४०५/२०१६.
दि. २० /१२/२०१६.

**विषय :- RTI ONLINE करिता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे माहितीबाबत...**

<u>परिपत्रक</u>

महाराष्ट्र शासनाचे अधिकृत वेबपोर्टल आपले सरकार वर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दि.२६/०१/२०१६ पासून RTI ONLINE ही सेवा महाराष्ट्र शासनामार्फत सूरु करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व नोडल ऑफिसर यांची माहिती याआधी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

RTI ONLINE ही सुविधा जिल्हा स्तरावर जानेवारी २०१७ पासून सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याचे मा.जिल्हा माहिती अधिकारी यांनी कळविले असून सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांच्या जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व नोडल ऑफिसर यांची माहिती प्रपत्र अ ब व क मध्ये सादर करण्यासंबंधी त्यांनी कळविले आहे.

तथापि, आपल्या विभागातील सद्यस्थितीतील माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची माहिती सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील प्रपत्र अ व क मध्ये तात्काळ सादर करावी. तसेच यापुढे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे स्थानांतरण झाल्यास अथवा इतर कोणाची यासाठी नेमणूक केल्यास तसे नागरी सुविधा केंद्र विभागास व महापालिकेच्या वेबपोर्टलवर सदर माहिती अद्ययावत करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागास लेखी पत्राव्दारे कळवावे.

**मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,**
नागरी सुविधा केंद्र,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

सोबत :- नमुना प्रपत्र अ व क
प्रति :-
सर्व विभागप्रमुख